सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# आयत्या पिठावर रेघोट्या ओढून फुकटचे श्रेय लाटू नका

## माजी आमदार कैलास गोरंटयाल यांचा प्रतिस्पर्ध्यांना टोला; 'त्या' कामाला आपल्याच कार्यकाळात मंजुरी

**जालना । प्रतिनिधी -** अंबड येथील ३५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाला आपल्या कार्यकाळात सुमारे ७२ कोटींच्या निधिसह राज्य शासनाची मंजुरी मिळाली असून त्याच वेळी कामाला देखील सुरुवात करण्यात आली होती. त्यामुळे विद्यमान आमदारांनी आयत्या पिठावर रेघोट्या ओढून फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये असा टोला जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी लगावला आहे.

जालना शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी राज्यात काँग्रेस आघाडीची सत्ता असतांना आपण जायकवाडी - जालना पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला होता आणि सदर प्रस्तावास मंजुरी मिळवून घेतली होती याची आठवण करून देत गोरंटयाल म्हणाले की, या प्रस्तावित योजनेच्या कामात देखील अनेक अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या विरोधकांनी केला होता.मात्र, या सर्व अडथळ्यांवर मात करून आपण योजनेचे काम तडीस लावले आणि या योजनेद्वारे जालना शहरातील जनतेला पाणी पुरवठा करण्याचा आपला संकल्प पूर्ण केला. या योजनेचे अंदाजपत्रक तयार करतांना प्रशासकीय पातळीवरून अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध करण्याची क्षमता चुकून १५ एमएलडी इतकी ठेवण्यात आली. त्यामुळे या ठिकाणी आणखी ३५ एमएलडी इतकी क्षमता असलेले जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी मंजुरी मिळावी तसेच राष्ट्रसंत गाडगे बाबा जलाशय (घानेवाडी) ते जेईएस महाविद्यालयाच्या पाठीमागे असलेल्या जुन्या एमआयडीसी भागातील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत या जीर्ण झालेल्या जलवाहिनीचे नव्याने काम करण्यासाठी आपण राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी पत्रव्यवहार करून त्या बाबत विधिमंडळाच्या अधिवेशनात देखील वारंवार पाठपुरावा केला होता.

त्यामुळेच आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात उपरोक्त दोन्हीही कामांना मंजुरी देत राज्य सरकारने त्यासाठी सुमारे ७२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केल्याचे सांगून त्यानंतर या कामाला आपल्याच कार्यकाळात सुरुवात झाली होती असे असतांनाही विद्यमान आमदार आपण मंजूर करून आणलेल्या व आपल्याच कार्यकाळात सुरू झालेल्या विकास कामांचे फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.आपण मंजूर करून आणलेल्या विकास कामांचे श्रेय लाटण्याऐवजी राज्यात सत्तेत असलेल्या या महाशयांनी शहराच्या विकासात भर पडेल असे काही तरी भरीव काम करून दाखवावे असे आव्हान गोरंटयाल यांनी दिले आहे.



### दररोज पाणी पुरवठा हे आपले स्वप्न होते - माजी आ. गोरंट्याल

राज्यात मुंबई, पुणे, नागपूर या शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा होतो. त्याच धर्तीवर जालना शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याचे आपले स्वप्न होते. तसे आश्वासन आपण विधानसभा निवडणुकीत प्रचारा दरम्यान शहरातील जनतेला देखील दिले होते.अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील आपल्या कार्यकाळात सुरू झालेले काम पूर्ण होताच शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याचे आपले स्वप्न साकार होईल असा विश्वास माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

---

## 'आता सर्जिकल स्ट्राइक नको, थेट पाक व्याप्त काश्मीर ताब्यात घ्या'

**नवी दिल्ली -** जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर तृणमूल काँग्रेस पक्षाचे नेते आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी रविवारी पाकिस्तानला धडा शिकवण्याची तसेच पाकिस्तानच्या ताब्यात असलेला काश्मीरचा भाग परत घेण्याची वेळ आली असल्याचे म्हटले आहे.

पाकिस्तानवर आणखी सर्जिकल स्ट्राईक किंवा प्रतीकात्मक इशारा देण्याची ही वेळ नाही. ही वेळ त्यांना कळेल अशा भाषेत धडा **पान ३ वर**

---

## युवा आदर्श
### जिव्हाळा ...

सवय होय उन्हांची
सावली उगाचं पोळे
सय आली दुःखाची
सुखात जेधवालोळे
नकोवाटे सोपेकाही
अवघड वाटेला वळे
अखंड प्रवास ध्यास
भलेयेवो पाया गोळे
फुलारे फूलावेलीवर
काट्या मी कुरवाळे
करमत नाही रे विरह
संकटे ती लेकुरवाळे
वाटते आली दिवाळी
निघाले जरी दिवाळे
जगण्याचे मोल कळे
शांतता देती उन्हाळे
सत्वजाणे निवाऱ्याचे
घसरडे का पावसाळे
जाणीवपूर्वक निर्मीले
शहारा आणी हिवाळे
दुस्वास दोस्तांसारखा
नको कुणाचे जिव्हाळे
आडमुठ्या म्हणे मज
वागणे माझे कोंगाळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# देण्यातच खरे पुण्य हा रोटरीच्या सेवा कार्याचा मूलमंत्र-डॉ. साबू

**जालना । प्रतिनिधी -** देण्याचाच खरे पुण्य आणि समाधान सामावलेले आहे. हेच कार्य रोटरीच्या सेवा उपक्रमातून होते आहे. स्वतःसाठी जगणं सहज असते, असे जगताना इतरांसाठी देणे हेच खरं पुण्य आहे, असे प्रतिपादन रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी येथे बोलताना केले.

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोला प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी गुरुवार दि. २४ एप्रिल रोजी अधिकृत भेट दिली. त्यानिमित्त हॉटेल सेफ्रानमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर फर्स्ट लेडी सौ. निर्मला साबू, सहाय्यक प्रांतपाल मोना भूमकर, क्लबचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा यांची उपस्थिती होती.

डॉ. साबू पुढे म्हणाले की, सर्वाधिक महिलांचा सहभाग ही रोटरी रेनबो क्लबची ओळख आहे. आपणदेखील या क्लबचे सदस्य असून, रेनबोच्या १२ वर्षाच्या प्रवासातूनच प्रांतपालाची संधी मिळाली आहे. जागतिक स्तरावरील रोटरी इंटरनॅशनलचा यंदाचा सर्विस अबाऊ सेल्फ हा सर्वोच्च व्यक्तिगत पुरस्कार ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल यांना जाहीर जाहीर झाल्याचा आणि उत्कृष्ट सेवा प्रकल्पांमुळे आज जालना रोटरीचे नाव प्रांतात मानाने आणि अभिमानाने घेतले जात असल्याचा आपणास अभिमान असल्याचे ते म्हणाले. सहाय्यक प्रांतपाल मोना भुमकर यांनी रोटरी रेनबो हा क्लब प्रांतातील उत्साही व प्रेरणादायी क्लबपैकी एक असल्याचे सांगून समाजाला आवश्यक असलेले आणि समाजात बदल घडविणारे प्रकल्प राबवून खरी उत्कृष्टता प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे या क्लबने दाखवून दिल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकपर भाषणात क्लबचे अध्यक्ष महेश माळी यांनी राबविण्यात आलेल्या स्पोर्ट्स कार्निवल, ग्रामीण भागात आरोग्य शिबिर, मधुमेह निदान अभियानातील सक्रिय सहभाग, आरोग्यवती स्पर्धा, जयपुर फूट शिबिर, वेदांता अॅकॅडमी अभियान आदी विविध उपक्रमाची माहिती दिली. याप्रसंगी पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सिपल जे. हेनरी डेव्हिड, मनेषकुमार सारडा, सुयोग सावजी, डॉ. आदीश घंटे या चार जणांनी क्लबचे सदस्यत्व स्वीकारले.

याप्रसंगी रोटरीचा सर्वोच्च जागतिक पातळीवरील पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ रोटरीयन अरुण अग्रवाल, एक लाख मधुमेह निदानाचे अब की बार एक लाख पार या अभियानाची उद्दिष्टपूर्ती अवघ्या सात महिन्यात करणारे डॉ. राजेश सेठीया, रोटरी ग्लोबल ग्रँट मंजुरी मिळवून देणारे अनुप करवा, सीएसआर अंतर्गत ग्लोबल ग्रँटसाठी ११६३ डॉलर देणारे अनुप जिंदल, जिल्हा शासकीय रुग्णालयातील शवविच्छेदन विभागासमोर नातेवाईकांसाठी वडील स्व. रामनिवास करवा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेड उभारणी करणारे क्लबचे सचिव गौरव करवा आणि प्रकल्प प्रमुख जयेश पहाडे यांना स्पेशल रेकगनेशन अवार्ड प्रदान करण्यात आले. गेल्या २० वर्षापासून रस्त्यावर फुल विक्रीचा व्यवसाय करून येणाऱ्या उत्पन्नातून समाजसेवा करणाऱ्या कौशल्या मारोतराव कदम, पतीच्या निधनानंतर कमी वयात ब्युटी पार्लरच्या माध्यमातून कुटुंबाची जबाबदारी सांभाळत तीन तीन मुलांचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या शोभाताई नंदकिशोर इंगळे, ३५ वर्षापासून मूगपुरीचा व्यवसाय करणारे स्व. लक्ष्मणदास तलरेजा यांना व्यवसायात सहाव्या वर्षापासून मदत करणारे त्यांचे पुत्र महेश तलरेजा यांचा वोकेशनल सर्विस अवार्ड देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे, रोटरी परिवारातील डॉ. दीपक बगडिया, रवी भक्कड, राजेंद्र अग्रवाल, अनया अग्रवाल, डॉ. अभय सोनी, गौरव मोदी, डॉ. नितीन नितीन खंडेलवाल, सीए स्मिता भक्कड, डॉ. प्रशांत पळनीटकर, विवेक मणियार, सागर दक्षिणी, केतन शहा, मधुलता भक्कड, सुनील गोयल, **पान ३ वर**




---

# सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून पारडगावात भैरवनाथाचे सभागृह

## जोगेश्वरी भैरवनाथ मंदिराच्या सभागृहाचे उत्साहात लोकार्पण



**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुक्यातील पारडगाव येथे (दि. २६) जोगेश्वरी भैरवनाथ मंदिराच्या सभागृहाचे लोकार्पण समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

पारडगाव येथील भजनी मंडळ आणि गावकऱ्यांनी एकत्रितपणे सतीश घाटगे यांच्याकडे भैरवनाथ मंदिराच्या सभागृहाचे निर्माण करण्याची मागणी केली होती. गावकऱ्यांची ही मागणी सतीश घाटगे यांनी पूर्ण केली. सतीश घाटगे यांनी शासनाकडून दहा लाख रुपयांचा निधी मिळवून देत हे सभागृह पूर्ण करून दिले. लोकार्पण सोहळ्यामध्ये बोलताना सतीश घाटगे पाटील म्हणाले, जोगेश्वरी भैरवनाथाच्या कृपेमुळे आणि गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे हे सभागृह आज आपल्या सेवेत रुजू झाले आहे. हे सभागृह गावकऱ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी उपयोगी ठरेल. या कार्यक्रमात अनेक गावकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. सर्वांनी सतीश घाटगे पाटील यांचे विशेष आभार मानले. भजनी मंडळाच्या सदस्यांनी या सभागृहासाठी विशेष परिश्रम घेतले.

---

## मुंबई इंडियन्सचा सलग पाचवा विजय; लखनऊला चाळली धूळ

**मुंबई -** जसप्रीत बुमराहच्या चार विकेट्सच्या जोरावर मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्सच्या फलंदाजीचं कंबरड मोडलं. यासह मुंबईने लखनौचा वानखेडेच्या मैदानावर ५४ धावांनी मोठा पराभव केला आहे. यासह मुंबई इंडियन्सने यंदाच्या मोसमातील सलग पाचवा विजय मिळवला आहे. मुंबईने लखनौला विजयासाठी २१६ धावांचं लक्ष्य दिलं होतं. पण मुंबईच्या भेदक गोलंदाजीसमोर लखनौचा संघ २० षटकांत फक्त १६१ धावा करत क्लीन बोल्ड झाला.

संपूर्ण संघ तुफान फॉर्मात असलेल्या मुंबई इंडियन्सने लखनौ सुपर जायंट्स संघावर ५४ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. या मोठ्या विजयासह मुंबईचा नेट रन रेट वाढला असून चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा संघ १२ गुणांसह थेट दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे.

मुंबई इंडियन्सने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी फटकेबाजी केली खरी, पण तिसऱ्या षटकात **पान ३ वर**

---

## कामगार दिनानिमित्त काव्य संविधान संमेलन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, जाणीव अस्मितेची साहित्य परिषद, मुद्रा साहित्य संस्था आणि संविधान संवाद समितीच्या वतीने कामगार दिनानिमित्त काव्य संविधान संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. जालना शहरातील कामगार कल्याण भवनात गुरुवार,१ मे रोजी सायंकाळी ७ वाजता हे संमेलन होणार आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक राम गायकवाड हे राहतील. ज्येष्ठ कामगार नेते अण्णा सावंत यांच्या हस्ते या संमेलनाचे उदघाटन करण्यात येणार आहे. यावेळी ज्येष्ठ कामगार कवि शिवाजी तेलंग, ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहेडकर, आंबेडकरी विचारवंत डॉ. विजय कुमठेकर, संत साहित्य अभ्यासक सुधाकर वाहुळे, सीटू संघटनेचे सचिव अनिल मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक खेडकर हे करणार आहेत. या काव्य संविधान संमेलनासाठी साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक कामगार कल्याण भवनाचे केंद्र संचालक जिज्ञेस पाटील, संयोजक कवि कैलास भाले यांनी केले आहे.

**या कवींचा सहभाग** सुनील लोणकर. डॉ. सुहास सदावर्ते, प्रा. पंढरीनाथ सारके, विनोद जैतमहाल, डॉ. प्रभाकर शेळके, प्रा. दिगंबर दाते, मनीष पाटील,रेखा गतखणे, डॉ. राज रणधीर, डॉ. एकनाथ शिंदे, डॉ. बी. जी. श्रीरामे, गणेश खरात, गजानन दराडे, विनोद काळे, कांचन थोरवे, रमा जानराव, मनीषा गायकवाड, प्रा. शोभना भालेराव, जिजा वाघ, दिनेश शेळके, मिलिंद घोरपडे, प्रा. कृष्णा कदम, सुरेश सोमधने,वसंत सूर्यवंशी, उषा बोर्डे, प्रदीप घाटेशाही,किशोर भालेराव, आबासाहेब म्हस्के हे निमंत्रित कवि सहभागी होणार आहे.

# महाराष्ट्रातील जनतेचा तसेच प्रशासनाचा २८ एप्रिल हा सेवा हक्क दिन

महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी '२८ एप्रिल' हा दिवस महाराष्ट्र राज्याच्या जनतेसाठी तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचा-यांसाठी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. १० वर्षांपूर्वी म्हणजे दिनांक २८ एप्रिल,२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने विशेष करुन तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणविस यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील जनतेला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क देणारा 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' अंमलात आणला आहे. या अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचा-यांवर अशा नियत कालमर्यादितच जनतेला लोकसेवा देण्याची जबाबदारी दिली आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे त्याचे उत्तरदायित्व निश्चित केले आहे. हा कायदा प्रशासकीय अधिका-यांना कर्तव्य भावनेतून जनतेची सेवा करण्यासाठी प्रेरीत करत आहे. या कायद्याने नव्याने निर्मित केलेल्या राज्य सेवा हक्क आयोगाने आपले ब्रीदवाक्य आपली सेवा आमचे कर्तव्य असे निर्धारित केलेले आहे.

शासनाने आयोगाच्या शिफारशी नुसार आयोगाने निर्धारीत केलेले बोधचिन्ह व ब्रीदवाक्य हे नागरीकांना दिल्या जाणा-या सर्व अधिसूचित सेवांच्या प्रमाणपत्रांवर मुद्रित केले जात आहे. हे बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य शासकीय विभागांकडून त्यांच्या अधिका-यांचा व कर्मचा-यांचा सेवाभाव हेच कर्तव्य ही कर्मयोगाची भावना उर्धृत तर करतेच शिवाय ती त्यांनी अवलंबलेली पारदर्शकता, संवेदनशिलता व कार्यक्षम समयोचितता अशा सर्वोत्तम गुणवत्तेची ग्वाही सुध्दा देत आहे.

सेवा हक्क अधिनियमाची जडणघडण

महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्येच दफतर विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अंमलात आणला. या कायद्यांतर्गत सुध्दा सर्व विभागांबाबत ते जनतेला देत असलेल्या सर्व लोकसेवांची नागरिकांची सनद त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर फलकाच्या स्वरुपात दर्शनी भागात प्रदर्शित करतील असे प्राविधान आहे. या नागरीकांच्या सनदेमध्ये लोकसेवा देणा-या अधिका-यांचे पदनाम लोकसेवा देण्यासाठी विहित केलेला कमाल कालावधी तसेच अशा लोकसेवा देणा-या पदनिर्देशित अधिकारी यांचेकडून विलंब झाल्यास किंवा सेवा नाकारल्यास अपील करावयाच्या अधिका-यांचे म्हणजेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे पदनाम (त्याच विभागाचे गट-ब चे राजपत्रित अधिकारी) तसेच जर प्रथम अपीलामध्ये अपीलार्थिचे समाधान झाले नाही तर द्वितीय अपीलीय प्राधिका-याचे पदनाम (त्याच विभागाचे गट-अ चे राजपत्रित अधिकारी) दर्शविण्यात यावे असे प्राविधान आहे. परंतु विद्यमान मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणविस यांनी स्वतः पुढाकार घेऊन या दफतर विलंबास प्रतिबंध अधिनियम या कायद्याचा परिणाम होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा अंमलात आणला.

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' कायद्याच्या कलम ५(२) नुसार पदनिर्देशित अधिकारी अर्ज मिळाल्यावर नियत कालमर्यादित एकतर थेट लोकसेवा देईल किंवा ती सेवा मंजूर करील किंवा फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करुन अर्ज फेटाळील. पदनिर्देशित अधिकारी, अर्जदाराला त्याच्या आदेशाविरुध्द अपील करण्याचा कालावधी आणि ज्याच्याकडे पहिले अपील दाखल करता येईल त्या प्रथम अपील प्राधिका-याचे नाव व पदनाम त्या कार्यालयीन पत्यासह लेखी कळविल अशी जबाबदारी पदनिर्देशित अधिका-यावर निश्चित केलेली आहे. तसेच कलम-१० नुसार, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये पदनिर्देशित अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कसूर केल्यास रु.५००/- पेक्षा कमी नसेल परंतू रु.५०००/- पर्यंत असू शकेल एवढी शास्ती चे प्राविधान आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

या कायद्याने या कायद्यातील सेवा हक्क प्राविधानांच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासाठी एक निष्पक्ष,स्वतंत्र आयोगाची निर्मिती केली गेली. हा आयोग मुख्य आयुक्त तसेच सहा महसूल विभागांसाठी प्रत्येकी एक आयुक्त यांचा बनलेला आहे. सदर आयुक्तांची नियुक्ती ही सेवानिवृत्त असलेल्या शासन किंवा सार्वजनिक प्राधिकरण यातील प्रशासनाचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या सार्वजनिक जीवनातील प्रख्यात अशा व्यक्तींमधून केली जाते. या अधिनियमाच्या कलम १६ अनुसार या कायद्याची अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व अधिक चांगल्या रितीने लोकसेवा देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी राज्य शासनाला सूचना करणे हे आयोगाचे कर्तव्यच असल्याचे नमूद केले आहे. लोकसेवा देण्याच्या कार्यपध्दतीमुळे ज्यामुळे लोकसेवा देण्यामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुलभता येईल असे बदल करण्याची शिफारस करणे तसेच लोकसेवा कार्यक्षमपणे देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनांसाठी शिफारस करणे अशा सर्व उपाययोजनां द्वारे आयोगाला सार्वजनिक प्राधिकरणांच्या लोकसेवा देण्याबाबत कामगिरीचे सनियंत्रण करणे असे अधिकार दिलेले आहेत.

आपले सरकार पोर्टल व मोबाईल प

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम २०(२) मध्ये पात्र व्यक्तींच्या अपेक्षांच्या प्रती पदनिर्देशित अधिका-यांना संवेदनशिल करणे आणि नियत कालमर्यादित पात्र व्यक्तींना लोकसेवा देण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे हे या कायद्याचे प्रयोजन व उद्दिष्ट असल्याचे नमूद केले आहे. याच कलमाचा अवलंब करुन महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांनी आपण देत असलेल्या जास्तीत जास्त सेवा या त्यांच्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर देण्याचे अवलंबिले आहे. अशा सर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवा दिनांक २८ एप्रिल, २०२५ पर्यंत ३३ विभागांच्या अधिसूचित करण्यात आलेल्या एकूण १०२७ सेवांपैकी ५८३ सेवा आपले सरकार पोर्टल व मोबाईल पद्वारे ऑनलाईन देण्यात येत आहेत. अधिसूचित केलेल्या सेवांमध्ये नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील आवश्यक सेवा उदा.जन्म/मृत्यू प्रमाणपत्र,उत्पन्न दाखला,वाहन परवाना, जात प्रमाणपत्र, मृद व जल नमुना तपासणी, बियाणे नमुना चाचणी,किटकनाशके नमुना चाचणी, जेष्ठ नागरिक प्रमाणपत्र,शेतकरी दाखला, वय राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र,रेशनकार्ड,ध्वनिक्षेपण परवाना, सभा-मिरवणूकांची परवानगी, विवाह नोंदणी प्रमाणपत्र,नमुना ८ अ चा उतारा देणे इ. लोकोपयोगी सेवा समाविष्ट आहेत.

सध्या प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत त्यांच्या विभागाच्या फक्त ७ अधिसूचित सेवांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. परंतु दिनांक २८ जानेवारी, २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे आता या ग्रामपंचायतीतील केंद्रांना, महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांच्या ऑनलाईन सेवेचे लॉगीन क्रेडेन्शियल्स देऊन त्यांच्या मार्फत सर्व विभागांच्या सर्व ऑनलाईन सेवांना अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे ग्रामिणांना हव्या असलेल्या कोणत्याही सेवेसाठी कोणत्याही विभागाच्या जिल्हास्तरीय वा तालुकास्तरीय कार्यालयात स्वतः जाऊन आपल्या अर्जाचा पाठपुरावा करण्याची आवश्यकता उरली नाही.

तसेच दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन्मा.मंत्री महोदय यांनी घोषणा केल्याप्रमाणे १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरुन नागरीकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार सेवा केंद्र चालकाद्वारे त्यांच्या घरी जाऊन त्यांचा अर्ज त्यांच्या समक्ष ऑनलाईन भरण्याची तसेच सेवा मंजूर झाल्यानंतर त्या सेवेचे प्रमाणपत्र / मंजूरी आदेश त्यांच्या घरी वितरीत करण्याची सेवादूत योजना सुरु केली आहे.

२८ एप्रिल सेवा हक्क दिन महोत्सव

शासनाच्या महसूल विभागाकडून १ ऑगस्ट हा दिवस महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो, तसेच एप्रिल महिन्यामध्ये २१ एप्रिल रोजी नागरी सेवा दिन तर २४ एप्रिल हा राष्ट्रीय पंचायतराज दिन म्हणून साजरा केला जातो परंतु या सर्व विभागांच्या विविध दिनांचा परिपाक म्हणजे २८ एप्रिल सेवा हक्क दिवस हा आहे. हा सेवा हक्क दिन महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक कार्यालयाकडून त्यांनी या वर्षभरात जनतेला दिलेल्या सेवांचा तसेच त्यांच्या सेवा हक्कांच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा वार्षीक लेखाजोखा त्यांच्या लाभार्थिना बोलावून किंवा जनतेच्या लोकप्रतिनिधींना बोलावून साजरा करायचा आहे. या दिवशी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये सर्व जिल्हाधिकारी आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री, खासदार, आमदार यांना विशेष आमंत्रित करुन तसेच सर्व जिल्हयांच्या विविध विभागांच्या अधिका-यांना बोलावून समारंभपूर्वक सर्व विभागांच्या विगत वर्षाच्या कामाचा आढावा घेतील.तसेच उपस्थित सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारीही या दिवशी त्यांच्या सेवानिष्ठेची,सचोटीची, सौजन्यतेची कटिबध्दता अधोरेखीत करणारी त्यांना नेमून दिलेली सेवा हक्क शपथ सुध्दा घेतील.

तसेच या महोत्सवी कार्यक्रमात ज्या अधिकारी /कर्मचा-यांनी या अधिनियमाच्या अनुसार सचोटीने व १००% प्रकरणांमध्ये नियत कालावधीत जनतेला अधिसूचित सेवा दिल्या असतील त्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा विशेष प्रशस्तीपत्र देऊन मा. पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात येईल. तसेच या दिवशी महाराष्ट्र शासनातर्फे मा. पालकमंत्री हे जनतेला तसेच शासकीय अधिका-यांना मार्गदर्शन करतील.

महाराष्ट्र शासनाने आपले सरकार सेवा पोर्टल हे पात्र व्यक्तींसाठी बहुतांश विभागांच्या कोणत्याही अधिसूचित लोकसेवेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी संयोजित व्यासपीठ आहे. http://aaplesarkar:mahaonline.gov.in आजवर ०१,०७,५१,००० नागरीकांनी या संकेतस्थळावर नोंदणी करुन सेवा घेतली आहे. याखेरीज आरटीएस महाराष्ट्र हे मोबाईल प गुगल प्ले स्टोअर / पल स्टोअर वर विनामूल्य उपलब्ध आहे. अर्जदार मराठी किंवा इंग्रजी पर्याय निवडू शकतो. पात्र व्यक्ती स्वतः अर्ज करु शकत नसल्यास महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये कार्यान्वित असलेल्या ३९,७८३ आपले सरकार सेवा केंद्रांद्वारेही अर्ज करुन सेवा घेता येते. ही केंद्रे खासगी केंद्रचालक चालवितात व त्यांच्यावर त्यांच्या निवडीपासूनच जिल्हाधिका-यांचे नियंत्रण असते. काही विभागांची स्वतंत्र पोर्टल्स आहेत उदा. महसूल विभागाचे महाभूलेख, परिवहन विभागाचे वाहन, सारथी इ.

हा अधिनियम लागू झाल्यापासुन १७ एप्रिल, २०२५ पर्यंत ऑनलाईन सेवांसाठी १८,७६,५२,११३अर्ज प्राप्त झाले त्यांच्या निपटा-याचे प्रमाण ९४.१५% आहे. सन २०२४-२५ मध्ये एकूण ०२,७७,२८०११ सेवा अर्ज प्राप्त झाले असून निपटा-याचे प्रमाण ९२.३३% आहे. अनेक अर्ज ऑफलाईन स्वरुपातही येतात. मात्र आयोगाने अनेक प्रयत्न करुन सुध्दा ऑफलाईन प्राप्त झालेल्या व निपटारा केलेल्या अर्जांची आकडेवारी संबंधित विभागांकडून उपलब्ध झालेली नाही. तथापी ही संख्या जवळपास ऑनलाईन आकडेवारीच असल्याचा अंदाज आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी अशा ऑफलाईन सेवा देण्याच्या प्रवृत्तींना आळा बसविण्यासाठी सर्व विभागांच्या सर्व सचिवांची विशेष बैठक घेऊन पुढील ३१ मे,२०२५ पर्यंत सर्व विभागांच्या सर्व सेवा या आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करुन द्याव्यात तसे च उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा ज्या सध्या ऑफलाईन आहेत त्या ऑनलाईन उपलब्ध करुन आपले सरकार या एकल पोर्टलवर संलग्न करुन १५ ऑगस्ट,२०२५ पर्यंत नागरीकांना उपलबध करुन देण्याविषयी निर्देश दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या तसेच आयोगाच्या वतीने मी महाराष्ट्राच्या सर्व जनतेला सेवा हक्क दिनाच्या शुभेच्छा देत आहे.

**लेखक- डॉ.किरण जाधव, (से.नि.भा.पो.से.)**
**राज्य सेवा हक्क आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**
**कार्यकाळ- दिनांक १ डिसेंबर, २०२१ पासुन आजतागायत**

# मोबाईलने बालपण हिरावून मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला

आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत. त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे.सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला ~~तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार~~ नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे.शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते. स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मानसिक त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना,जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात.जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारीरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते कहा गये ओ दिन

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# नवनियुक्त न्यायाधीशांचा सत्कार समारंभ संपन्न





**मुंबई -** अचिव्हर्स बँक्वेट हॉल क्रमांक सोलापूर येथे पोलिस मुख्यालयाजवळ ईद मिलन साजरा करण्यासाठी आणि नवनियुक्त न्यायाधीशांचा सन्मान करण्यासाठी एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी, न्यायिक समुदाय, वरिष्ठ वकील, प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवर सन्मानाने उपस्थित होते. पारंपारिक पद्धतीने 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा देवाणघेवाणीने उत्सवाची सुरुवात झाली. ईद मिलनच्या या पवित्र प्रसंगी, सर्व समुदायांच्या लोकांनी एकमेकांना मिठी मारली आणि बंधुता आणि सौहार्दाचा संदेश दिला. त्यानंतर, नुकत्याच नियुक्त झालेल्या न्यायाधीशांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणांमध्ये, वक्त्यांनी न्यायव्यवस्थेचे महत्त्व आणि न्यायाधीशांची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी नवनियुक्त न्यायाधीशांना त्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये शुभेच्छा दिल्या आणि ते निष्पक्ष आणि न्याय्य निर्णयांद्वारे समाजात न्याय प्रस्थापित करतील अशी आशा व्यक्त केली. या समारंभात कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री मनोज शर्मा (मुख्य, जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर), पद्मश्री उज्वल निकम (विशेष सरकारी वकील, महाराष्ट्र राज्य), अधिवक्ता अनिता हवालदार आणि मुझरीन जेलर यांनी न्यायाधीश पदासाठी घेतलेली परीक्षा उत्तीर्ण केली. दोघांनाही सन्मानित करण्यात आले. ड विजय शिंदे (अध्यक्ष सोलापूर बार असोसिएशन, सोलापूर), डव्होकेट खानिब वकील (अध्यक्ष धर्मादाय आयुक्त, सोलापूर), दैनिक. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस खान, अधिवक्ता असीम बांगी, अधिवक्ता परवेझ कुरनुरकर, अधिवक्ता शाहबाज दिलशाद खान उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सामुदायिक मेजवानी आणि संवादाने झाली ज्यामध्ये सर्वांनी विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. हा कार्यक्रम सुसंवाद, सद्भावना आणि न्याय या मूल्यांना बळकटी देणारा ठरला.

## वाचकांचे मनोगत

# गोठिवरे येथे बिबट्याची दहशत

राजापूर ( महादेव गोळवसकर) राजापूर तालुक्यातील गोठिवरे येथील तिठवा भुरकाव परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे.येरम वाडीतील मंगेश येरम यांचा पाळीव कुत्रा गुरुवार, दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता परिसरात आलेले वानर पाहून तीन कुत्रे वानरांचा माग घेत असताना बिबट्याने मंगेश येरम यांच्या एका कुत्र्यांवर झडप घातली.येरम वाडीतील महादेव येरम यांचा एक कुत्रा,कृष्णा येरम यांचे दोन कुत्रे.विनायक हळदणकर यांचा एक कुत्रा बिबट्याने याची ठार केले आहेत. सागवे - गोठिवरे - येरम वाडी येथे मंगेश शिंत्रे यांची एक गाय ,कर्ना वाघधरे यांची एक गाय , विजय बारस्कर यांची रेडी या अगोदर बिबट्याने मारली आले. मंगेश येरम व विजय रोकडे यांना बिबट्याचे गोठिवरे रस्त्यावर दर्शन झाले आहे.बिबट्याच्या मुक्त संचारामुळे गोठिवरे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.राजापूर वन विभागाच्या अधिकार्यांनी बिबट्या जेरबंद करावा अशी मागणी ग्रामस्थ करित आहेत.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

# पक्ष संघटनेची मजबूत बांधणी करा -अंबादास दानवे

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची व पक्षाच्या अंगीकृत असणार्या सर्व संघटनांची मजबूत बांधणी करा, असे आवाहन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले. जालना शहरातील शिवसेना भवन येथे शहरातील पदाधिकार्यांची संघटनात्मक आढावा बैठक शनिवार २६ एप्रिल रोजीी संपन्न झाली. यावेळी या बैठकी मार्गदर्शन करताना राज्याच्या विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे उपनेते लक्ष्मणराव वडले, जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले, माजी नगरसेवक संदीप झारकंडे, संदीप नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी पदाधिकार्यांना म ार्गदर्शन करताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, मागील काळात पक्षात झालेल्या फुटाफुटी नंतर रिक्त झालेली संघटनात्मक पदे तात्काळ भरणे गरजेचे आहे. त्यामुळे पक्ष संघटन मजबूत होईल. पक्ष संघटन बांधणी चांगली करुन आगामी निवडणुका आपण जिंकू. संघटनेच्या रिक्त जागा भरण्याबरोबरच महिला आघाडी, युवा सेना, दलित आघाडी, यासह सर्व अंगिकृत संघटनांच्या पदाधिकार्यांच्या नियुत्तयाही प्रामुख्याने करण्यात याव्यात, असेही ते म्हणाले. पक्ष संघटन बळकट व मजबूत असेल तर आपण कोणत्याही निवडणुका सहज जिंकू शकतो, असे ते म्हणाले. या बैठकीत दलित आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी रविकांत जगधने, युवा सेनेच्या शहर प्रमुखपदी सुदर्शन चौधरी, युवा सेनेचा उपशहर प्रमुखपदी किरण तुम्मा, अल्पसंख्यांक आघाडीच्या शहर प्रमुखपदी वसीम खान, युवा सेनेच्या उपशहरप्रमुख पदावर स्वराज बोर्डे यांची तर पक्षाच्या उपशहर प्रमुखपदी अजय रोडीये यांच्या नियुत्तया करण्यात आल्या. यावेळी पदाधिकार्यांना मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, नागरी प्रश्नावर शहर शाखेने आवाज उठवावा. शहरातील अनेक भागात १५-१५ दिवस पाणी मिळत नाही. यावर केवळ एक दोन आंदोलन करून चालणार नाही तर त्यावर वारंवार आवाज उठवावा लागेल. प्रशासनावर दबाव निर्माण करुन जनतेचे प्रश्न मार्गी लावावे लागतील. असे केल्याने जनतेच्या मनात आपल्या पक्षप्रती विश्वास निर्माण होईल. प्रत्येक पदाधिकार्यांनी आपल्या वार्डातील समस्या सोडविण्यासाठी तत्पर असले पाहिजे. याबरोबर रेशन कार्ड, आधार कार्ड, शासकीय योजना या सर्व काम ांसाठी जनतेला मदत केली पाहिजे असे आवाहन ही अंबेकर यांनी केले. यावेळी माजी नगरसेविका गंगुताई वानखेडे, जगन्नाथ चव्हाण, महिला आघाडी जिल्हा संघटक मंगल मेटकर, रविकांत जगधने, युवासेना शहर जिल्हाध्यक्ष राजू




सलामपुरे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश राऊत, अंकुश राजेजाधव, विभाग प्रमुख चेतन भुरेवाल, संतोष क्षत्रिय, युवासेना तालुका प्रमुख संदीप म गर, विभाग प्रमुख सखावत पठाण, दर्शन चौधरी, अजय रोडीये, संतोष क्षत्रिय, गणेश लाहोटी, वसंत घुगे, मंजुषा घायाळ, वसीम खान, संजय रत्नपारखे, नितीन बंसवाल, तुकाराम भुतेकर,जीवन खंडागळे, कृषी खिरे, स्वराज बोर्डे, राजेश शेळके, तुळजाराम माधवले, चुनीलाल माधवले, रमेश तुंगेवार, गुड्डू खान, सुनील तोडकर, शेख खाजा, योगेश जाधव, राम कुलथे, रामेश्वर कुरील यांच्यासह आदी पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

# निबंध व चित्रकला स्पर्धेचे बक्षिस वितरण




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंचायत राज दिनाचे औचित्य साधून दिनांक २५ एप्रिल रोजी माझ्या स्वप्नातील गाव या विषयावर निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ भाजपा कार्यालयात म ोठ्या उत्साहात पार पडला, ही स्पर्धा भाजपा महानगर अध्यक्षा सौ. शुभांगी देशपांडे यांच्या वतीने, पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये जालना शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यामध्ये ४०० पेक्षा जास्त निबंध आणि १०० पेक्षा जास्त चित्रकलेद्वारे विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पनेतील आदर्श गाव उभे केले.

बक्षीस समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्री. संतोष पाटील दानवे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रदेश निमंत्रित सदस्य श्री.राजेश भैय्या राऊत, भाजप जिल्हाध्यक्ष श्री.बद्रीनाथ पठाडे, महानगर अध्यक्ष श्री.सतीश जाधव, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. संध्या देठे, श्री. सिद्धिविनायक मुळे, मंडळ अध्यक्ष श्री.सुनील खरे, महेश निकम, अमोल धानोरे, संजय डोंगरे, कपिल दहेकर सांस्कृतिक प्रकोष्ट सौ.दीपा बिनीवाले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. सौ.शुभांगी देशपांडे यांच्यासोबत, नीलावती धावणे, अमृता धावणे, सौ.अरुणा फुलमामडीकर, सौ. विशाखा नाईक, सौ.छाया पाटील, सौ. सुरेखा बोटवे, या कार्यकारिणीने विशेष मेहनत घेतली. आमदार श्री. दानवे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले, अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण होते आणि गावाच्या विकासाचा विचार रुजतो, हे विशेष कौतुकास्पद आहे.

पान १ वरुन

## देण्यातच खरे ...

कल्पेश भक्कड, क्लब बुलेटिनचे एडिटर संतोष तिवारी, आशिष नावंदर यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक मणियार यांनी केले तर आभार गौरव करवा यांनी मानले.

## मुंबई इंडियन्सचा ...

बुमराहने संघाला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला. एडन मारक्रम ९ धावा करत बाद झाला. तर मिचेल मार्श ३४ धावा करत बाद झाला. निकोलस पुरन आणि मार्शने पॉवरप्लेमध्ये संघाला ६० धावांचा टप्पा गाठून दिला. पण विल जॅक्सने पुरन आणि पंतला एका षटकात बाद करत सामना मुंबईच्या बाजूने फिरवला.

आयुष बदोनीने संघाचा डाव सावरला, पण मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी फलदाजांना सामन्यात परतण्याची फारशी संधी दिली नाही. आयुष बदोनी २२ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह ३५ धावा करत बाद झाला. लखनौकडून ही फलंदाजाची सर्वाधिक धावसंख्या होती. याशिवाय रवी बिश्नोईने १३ धावा केल्या.

जसप्रीत बुमराहने १६व्या षटकात मिलर, अब्दुल समद व आवेश खानला क्लीन बोल्ड करत ३ विकेट्स घेतल्या आणि मुंबईचा विजय निश्चित केला. यानंतर मुंबईकडून पदार्पण करणाऱ्या कार्बिन बॉशने १९व्या षटकात बिश्नोईला क्लीन बोल्ड करत पहिली आयपीएल विकेट मिळवली. तर बोल्टने अखेरच्या षटकातील पाचव्या चेंडूवर दिग्वेश राठीला क्लीन बोल्ड करत लखनौला १६१ धावांवर क्लीन बोल्ड केलं. मुंबईकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ विकेट्स घेतले, तर ट्रेंट बोल्टने ३, विल जॅक्सने २ आणि कॉर्बिन बॉशने १ विकेट घेतली.

लखनौने नाणेफेक जिंकत मुंबई इंडियन्सला फलंदाजीसाठी पाचारण केलं. रायन रिकल्टन आणि रोहित शर्मानेे चांगली फटकेबाजी करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. पण रोहित शर्मा २ षटकारांसह १२ धावा करत झेलबाद झाला. पण यानंतर रायन रिकल्टनने संघाचा डाव सावरला. रिकल्टने ३२ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह ५८ धावा करत झेलबाद झाला. तर विल जॅक्स २९ धावा करत बाद झाला.

यानंतर सूर्यकुमार यादवने जबाबदारी घेत २८ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटाकारांसह ५४ धावा केल्या. यासह सूर्याने यंदाच्या सीझनची ऑरेंज कॅप्देखील मिळवली आहे. तिलक वर्मा आणि हार्दिक मोठी धावसंख्या रचू शकले नाहीत. नमन धीर आणि कार्बिन बॉश यांनी महत्त्वपूर्ण धावा केल्या. नमन धीरने ११ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २५ धावा तर कार्बिनने १० चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह २० धावा करत मुंबईची धावसंख्या २१५ वर नेली.

## आता सर्जिकल ...

शिकवण्याची आहे. पाकिस्तान व्याप्त काश्मीर (पीओके) परत घेण्याची वेळ आली आहे, असे टीएमसी खासदार बॅनर्जी त्यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत. तसेच बॅनर्जी यांनी पक्ष राजकारणाचा विचार सोडून या मुद्द्यावर कायमचा तोडगा काढला पाहिजे असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून आपण मुख्य प्रवाहातील माध्यमांचे आणि केंद्र सरकारमधील लोकांचे वर्तन आपण बारकाईने पाहत आहोत, या पूर्वी कधीही न घडलेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी कारणीभूत त्रुटींचा सखोल तपास करण्याऐवजी ते एका विशिष्ट राजकीय पक्षाला फायदा होईल अशा गोष्टी सांगण्यावर लक्ष केंद्रीत करत आहेत. अशा क्षुल्लक राजकारणापासून राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नावर एकदाच कायमचा तोडगा काढण्याची वेळ आली आहे, असेही बॅनर्जी यावेळी म्हणाले आहेत.

२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्या २६ जणांचा मृत्यू झाला आहे, यापैकी बहुतांश जण हे पर्यटक होते. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागील दहशतवाद्यांना आणि कटात सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा दिली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पुन्हा सांगितले आहे. तसेच मोदींनी पीडितांना न्याय मिळेल असे म्हटले आहे. तसेच 'मन की बात' या कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतीयांची एकता ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे.



# एकत्रित विचाराचे कुटुंब ही आपल्या संस्कृतीची देणगी - ह.भ.प. झगरे गुरुजी

**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - मनुष्याकडे शारीरिक बळ अथवा आर्थिक बळ असो या नसो परंतु अशावेळी त्या व्यक्तीकडे कौटुंबिक बळ असल्यास तो खचत नाही, त्याला कुटुंबातील आदर्श जोपासता आले तर तो नक्कीच आलेल्या परिस्थितीशी लढण्यासाठी तयार असतो, बहुतांश होणाऱ्या आत्महत्या या कौटुंबिक वादातून झाल्याचे सुद्धा निदर्शनास येते याकरिता प्रत्येकाने कुटुंबातील खचलेल्या व्यक्तीला शाब्दिक व मानसिक आधार दिला पाहिजे असे प्रतिपादन ह. भ . प. ज्ञानेश्वर झगरे गुरुजी यांनी शुक्रवारी ता.२५ केले खानापूर ता. जाफराबाद येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह किर्तन सेवेत ते बोलत होते.यावेळी पुढे बोलताना श्री झागरे म्हणाले की एखाद्या समोर राहिलेल्या समस्या निवडण्यासाठी सर्वांनी मिळून कौटुंबिक व गाव पातळीवर प्रयत्न केले पाहिजे,यासाठी प्रत्येकाला कौटुंबिक आधार असावा, तसेच एक गाव हे सुद्धा आपले कुटुंब आहे असा विचार गावागावात रुजवणे गरजेचे आहे. यातून आदर्श कुटुंब व्यवस्था व पर्यावरण पूर्वक समाज व्यवस्था तयार व्हायला मदत होईल. राम राज्यामध्ये जोपर्यंत कैकयीच्या मनामध्ये विकल्प शिरला नाही तोपर्यंत राम राज्यात आनंद होताच परंतु जेव्हा मंथरेच्या माध्यमातून विकल्प कैकयीच्या



अंतकरणात प्रवेश करतो त्यावेळेला रामराज्यातील दुःखाला सुरुवात होते,


यासाठी कुटुंब फुटेल, गावातील विचार फुटतील अशा विचारापासून सावध राहावे कारण कौटुंबिक आणि वैचारिक एकता हेच मोठे बळ आहे असेही ते म्हणाले.प्रतिपादन ह भ प ज्ञानेश्वर माऊली झगरे गुरुजी यांनी केले. बौद्धिक बळाचे महत्त्व समजावून सांगताना त्यांनी नुकताच यूपीएससीमध्ये राज्यात गुणवत्ता यादीत झळकलेला एका सामान्य कुटुंबातील बिरुदेव सिद्धाप्पा डोणे यांचे उदाहरण देऊन प्रत्येकाने हव्या त्या परिस्थितीमध्ये ज्ञान प्राप्त करून त्याला त्यासाठी कौशल्यपणाला लावून आपले सामर्थ्य जगाला दाखवणे गरजेचे आहे असे सांगितले. आई-वडिलांची सेवा, शिक्षणाचे महत्त्व, तसेच मिळालेल्या परिस्थितीमध्ये आनंदाने जगण्याचे विचार त्यांनी आपल्या कीर्तनातून मांडले. या कीर्तन सेवेसाठी साधनव्यक्ती ह. भ. प. नारायण महाराज पिंपळे तसेच दिलीप पऱ्हाड व पंचक्रोशीतील गायक, वादक या सोबतच परिसरातील श्रोत्यांची उपस्थिती होती.

# व्यापारी महासंघातर्फे जालना क्रेडाई पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्हा व्यापारी महासंघातर्फे क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव चेतन मराठे, उपाध्यक्ष अविनाश भोसले आणि कोषाध्यक्ष सिद्धांत शर्मा आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थानी जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी हे होते. व्यासपीठावर सत्कारमूर्तींसह व्यापारी महासंघाचे महासचिव श्याम लोया यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात विनीत साहनी यांनी व्यापारी महासंघाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. व्यापार क्षेत्रातील समस्यांचे निरसन, व्यापाऱ्यांच्या हितासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि महासंघाच्या कार्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. बदलत्या जागतिकीकरणाच्या काळात व्यापार व उद्योग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या समस्यांवर व्यापारी महासंघ व क्रेडाई एकत्रितपणे काम करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत त्यांचा सन्मान केला.

सत्काराला उत्तर देताना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार म्हणाले की, क्रेडाई संघटना बांधकाम व्यावसायिकांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करणार आहे. व्यावसायिकांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासह कामगारांच्या आरोग्य आणि कौशल्यविकासावर विशेष भर देण्यात येणार आहे. शासनाने जालना शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी आगामी ५० वर्षांचा आराखडा तयार करण्यासाठी गोखले इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे. या आराखड्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि व्यावसायिकांच्या अपेक्षांची मांडणी करण्यासाठी क्रेडाई व व्यापारी महासंघ एकत्रितपणे चर्चेचे व्यासपीठ उभारणार



आहे. यासाठी व्यापारी महासंघाच्या सहकार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली व सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानले.

प्रास्ताविकपर भाषणात शाम लोया यांनी व्यापारी महासंघाच्या कार्याचा आणि विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी क्रेडाई संघटनेच्या देशभरातील कार्याची माहिती उपस्थितांना दिली. क्रेडाई ही देशातील सर्वांत मोठी बांधकाम व्यावसायिकांची संघटना असून, बांधकाम क्षेत्राच्या विकासासाठी व व्यावसायिकांच्या प्रश्नांवर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी व्यापारी महासंघाचे कोषाध्यक्ष विजय राठी, कार्याध्यक्ष बंकटलाल खंडेलवाल, दिलीपभाई शहा, विजय सुराणा, विजय बगडिया, राजेश कामड, विनोद पवार, ईश्वर बिल्लोरे, प्रमोद गंडाळ आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद पवार यांनी केले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.